NAREDCO MAHARASHTRA

MINEPRO COMMUNICATIONS
new-age image & reputation curators

पुण्य नगरी

# राष्ट्रीय रिअल इस्टेट परिषदेत महाराष्ट्राचा ठसा उमटणार

**मुंबई :** राष्ट्रीय शहरी व रिअल इस्टेट विकास परिषद २०२६ ही १३-१४ फेब्रुवारीदरम्यान नवी दिल्लीतील यशो भूमी येथे होत आहे. या परिषदेत नरेडको महाराष्ट्र ही रिअल इस्टेट क्षेत्रातील शिखर संस्था राज्याच्या सहभागाचे नेतृत्व करणार आहे. मुंबई महानगर प्रदेश, पुणे, नागपूर, नाशिक आणि इतर उदयोन्मुख शहरांतील पायाभूत सुविधा बळकट करणे, गृहनिर्माण पुरवठा सुधारणे आणि शाश्वत शहरी विकासास चालना देण्याचे प्रयत्न यामध्ये अधोरेखित केले जातील. महाराष्ट्र भारतातील शहरी आणि रिअल इस्टेट विकासात अग्रस्थानी राहिला आहे. या परिषदेद्वारे राज्यातील रिअल इस्टेट क्षेत्राशी संबंधित विविध विषयांचा उहापोह होईल, ज्यातून या क्षेत्राच्या विकासाला अधिक योग्य दिशा मिळेल, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष प्रशांत शर्मा यांनी व्यक्त केला. परिषदेत ट्रान्झिट-आधारित विकास, मोठ्या प्रमाणातील पुनर्विकास प्रकल्प, भाडेगृह योजना आणि निवासी-व्यावसायिक मिश्र विकासावर राज्याचा भर मांडला जाईल. व्यवसाय सुलभता, पायाभूत विस्तार आणि तंत्रज्ञानाधारित शहरी नियोजन यांवर लक्ष केंद्रित केले जाईल.